# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः06.08.2025** **वारःबुधवार**

1. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण, 2025 ला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता
2. राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर होण्याची शक्यता
3. राज्य सरकारचा पहिला छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार युनेस्कोमधले भारताचे प्रतिनिधी विशाल शर्मा आणि अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण संघाला प्रदान
4. उत्तराखंडमध्ये ढगफुटीमुळे मोठं नुकसान, मदत आणि बचाव कार्य सुरू आणि
5. राज्यातल्या अनेक भागांत पुढचे चार दिवस जोरदार पावसाचे

**<u>राज्य मंत्रीमंडळ</u>**

महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण, 2025 ला काल राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. देशाच्या एकूण स्टार्टअपपैकी 18 टक्के स्टार्टअप महाराष्ट्रात आहेत. स्टार्टअप उद्योगांची अधिक प्रभावी परिसंस्था तयार करण्यासाठी हे कालसुसंगत नवीन धोरण आखण्यात आलं आहे. यात शहरी आणि ग्रामीण भागांतील तसंच महिलांच्या आणि युवकांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना विशेष प्रोत्साहन दिलं जाईल. पालघर जिल्ह्यातलं वाढवण बंदर आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाला शीघ्रसंचार द्रुतगती महामार्गानं जोडण्याला मंत्रीमंडळानं मंजूरी दिली. नाशिक जिल्ह्यातल्या चांदवड तालुक्यातल्या भरवीर इथं हे मार्ग जोडण्यात येतील. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अतिरिक्त जमिनींचा व्यापारी तत्वावर वापर करण्याच्या सुधारित धोरणालाही मंजूरी देण्यात आली. या धोरणानुसार महामंडळाच्या जमिनींच्या भाडेपट्टा कराराचा कालावधी 49 वर्षांच्या दोन टप्प्यात मिळून 98 वर्षे करण्यास मंजुरी देण्यात आली. कुष्ठरुग्णांसाठी कार्यरत 13 खासगी स्वयंसेवी संस्थांचं अनुदान प्रति रुग्ण 2 हजारांवरून 6 हजार रुपये करायलाही मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**<u>निवडणुका-नाशिक</u>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका दिवाळीनंतर घेण्यात येतील. साधारणत: ऑक्टोबर महिन्यात प्रक्रीया सुरू होऊन जानेवारी 2025 मध्ये निवडणूका पूर्ण होतील अशी माहिती राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. नाशिक इथं उत्तर महाराष्ट्रातील पाचही जिल्ह्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा त्यांनी काल आढावा घेतला. त्यानंतर वार्ताहर परीषदेत ते बोलत होते. सर्वोच्च न्यायालयानं ओबीसी आरक्षणाला मान्यता दिल्यानं सोडत पद्धतीनं प्रभागातून आरक्षण काढण्यात येईल, असं त्यांनी सांगितलं. प्रभाग रचना, मतदार याद्या या सर्व प्रकारच्या कार्यवाहीला वेळ लागणार असल्यामुळे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका एकाच वेळी घेणं शक्य नाही. टप्प्याटप्प्यानं निवडणूका घेण्यात येतील. तसंच या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येणार नाही असं त्यांनी सांगितलं.

**<u>छावा राइड-मुंबई</u>**

ओला, उबेर, रॅपिडोच्या धर्तीवर राज्य सरकार 'छावा राइड' या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना खासगी वाहतूक सुविधा पुरवणार आहे. या ॲपवरुन नागरिकांना रिक्षा, टॅक्सी आणि बसचं आरक्षण करता येईल. एसटी महामंडळ हे ॲप सुरू करणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**<u>लाडकी बहीण-मुंबई</u>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतलेल्या 14 हजार पुरुषांना पैसे परत करण्याची नोटीस राज्य सरकारनं पाठवली आहे. महिनाभरात पैसे परत दिले नाही; तर गुन्हा दाखल करण्याचा इशारा सरकारनं त्यांना नोटीशीद्वारे दिला आहे. योजना सुरू झाल्यापासून सुमारे साडे 21 कोटी रुपये या पुरुषांच्या खात्यात जमा झाले आहेत.

**<u>संसद</u>**

संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरू होऊन तीन आठवडे झाल्यानंतरही विरोधकांच्या गदारोळामुळे कुठल्याच सभागृहात कामकाज होत नसल्याबद्दल संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी काल नाराजी व्यक्त केली. तीन आठवड्यांत संसदेत एकही विधेयक मंजूर होऊ शकलं नाही असं ते काल माध्यमांशी बोलताना म्हणाले. विरोधकांनी सहकार्य करुन संसदेचं कामकाज सुरळीत चालू द्यावं असं आवाहन रिजिजू यांनी केलं. दरम्यान एनडीएच्या काल सकाळी झालेल्या बैठकीत ऑपरेशन सिंदूर आणि ऑपरेशन महादेव यांच्या यशाबाबतचा ठराव संमत झाल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>स्वातंत्र्य दिन आमंत्रण-धाराशिव</u>**

येत्या स्वातंत्र्यदिनी होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी राष्ट्रपती भवनातर्फे धाराशिव जिल्ह्यातल्या शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातले डॉक्टर शुभम धूत यांना निमंत्रित करण्यात आलं आहे. याबाबत आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉक्टर धूत म्हणाले....

**आज हम जो कुछ आयुर्वेदक क्षेत्र में काम कर रहे हैं हमने पूरे विश्व का पहला रक्तामृतमोफीलिया आयुर्वेद रिसर्च एंड डेवलपमेंट सेल योजित कोई हीमोफीलिया का रिसर्च एंड डेवलपमेंट इन आयुर्वेदा क्षेत्र में विश्व का पहला सेल हमने डॉक्टर एनएस गंगा सागर जो अधिष्ठाता है उनके मार्गदर्शन में बनाया है। पूरे विश्व के लिए एक बहुत अच्छा संदेश है और बहुत अच्छी हमने इनिशिएटिव लिया है। आयुर्वेद में भी रेअर डिसऑर्डर पे काम हो सकता है और वो हमने साबित करके दिखाया है की ये सिर्फ मेरा अकेले का सम्मान नहीं ये पूरे आयुर्वेद विश्व का सम्मान है।**

**<u>पुरस्कार</u>**

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागानं जाहीर केलेले विविध पुरस्कार काल मुंबईत मान्यवरांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले. गजलगायक भीमराव पांचाळे यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्कार, आणि निर्माते महेश मांजरेकर यांना चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. राज्य सरकारनं जाहीर केलेला पहिला छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार युनेस्कोमधले भारताचे

प्रतिनिधी विशाल शर्मा आणि अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण संघाला प्रदान करण्यात आला. गिर्यारोहण महासंघाचे उमेश झिरपे, ऋषिकेश यादव, माधव फडके यांना यावेळी सन्मानित करण्यात आलं.

**<u>महादेवी हत्तीण</u>**

कोल्हापूरातल्या नांदणी मठातल्या महादेवी हत्तीणीला परत आणण्याबाबत जनभावना लक्षात घेऊन नांदणी मठानं सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करावी असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. राज्य शासनही स्वतंत्र पुनर्विचार याचिका दाखल करून हत्तीणीला परत देण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात भूमिका मांडेल, याप्रकरणी राज्य शासन पूर्णपणे मठाच्या पाठीशी आहे असं ते म्हणाले. याप्रश्नी मंत्रालयात झालेल्या बैठकीत ते काल बोलत होते.

**<u>कबूतर व्यवस्था</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रालयात कबुतरखान्याच्या प्रश्नासंदर्भातही बैठक झाली. कबुतरांचे जीव वाचवणं, पर्यावरणाचं रक्षण करणं आणि नागरिकांचं आरोग्य सुरक्षित ठेवणं, या तिन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत; त्यामुळे पर्यायी व्यवस्था पूर्ण होईपर्यंत महानगरपालिकेनं कबुतरांना नियंत्रित खाद्यपुरवठा सुरू ठेवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**<u>कापडी राख्या-नवी मुंबई</u>**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वस्त्र पुनर्प्रक्रिया केंद्रात टाकाऊ कपड्यांवर पुनर्प्रक्रिया करून कापडी राख्या तयार करण्यात आल्या आहेत. या प्रकल्पाद्वारे बचत गटातील महिलांना मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे. ऐकूया अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालयाच्या अखत्यारितील वस्त्र समितीनं नवी मुंबई महानगरपालिकेच्या सोबत वस्त्र पुनर्प्रक्रिया सुविधा प्रकल्प सुरू केला आहे. देशातला अशा प्रकारचा प्रकल्प पहिल्यांदाच सीबीडी बेलापूर इथं उभारण्यात आला आहे. या केंद्रात नागरिकांनी वापरलेले सुस्थितीतले टाकाऊ कपडे वेगवेगळ्या ठिकाणाहून संकलित केले जातात. जमा झालेले कपडे प्रकल्पस्थळी आणून त्यांची आठ प्रकारे वर्गवारी करण्यात येते. कपडयांवर त्यांच्या स्वरुपानुसार पुनर्प्रक्रिया करुन त्यापासून धागे वेगळे काढले जातात आणि नवीन कापड तयार केलं जातं. रक्षाबंधनाचा सण लक्षात घेऊन प्रकल्पस्थळी विविधरंगी आकर्षक कापडी राख्या बनवण्यात आल्या आहेत. वस्त्र पुनर्प्रक्रिया प्रकल्पातून निर्माण केलेल्या या आकर्षक कापडी राख्यांचा उपयोग नागरिकांनी करावा असं आवाहन महापालिकेनं केलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी नवीमुंबईहून स्वप्ना हराळकर यांच्यासह सुरेखा जोशी पुणे.**

**<u>गणेश विसर्जन</u>**

पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूकीत सहभागी होण्यावरून झालेला वाद समन्वयातून सोडवला जाईल, असं काल झालेल्या गणेश मंडळांच्या बैठकीत निश्चित करण्यात आलं. पोलिस आयुक्तालयात गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. विसर्जन मिरवणूक सकाळी सात वाजता सुरू करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. भाऊ रंगारी गणेश मंडळ मानाच्या पाच गणपतीनंतर मिरवणुकीत सहभागी होणार असल्याचं मंडळानं जाहीर केलं.

**<u>अग्निवीर</u>**

राज्यातील अग्निवीर आणि नियमित उमेदवारांच्या लष्करातील भरतीसाठी येत्या 9 ते 19 ऑगस्ट या कालावधीत पुण्यात तर 3 ते 13 सप्टेंबर या कालावधीत नागपूरमध्ये भरती मेळावे होणार आहेत.

**<u>निधन-रत्नागिरी</u>**

रत्नागिरी जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष हिराचंद परशुराम ऊर्फ हिराभाई बुटाला यांचं काल अल्पशा आजारानं पुण्यात निधन झालं. ते 81 वर्षांचे होते. खेड तालुक्यातल्या अनेक सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक संस्थांशी ते निगडित होते.

**<u>उत्तराखंड ढगफुटी</u>**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात झालेल्या ढगफुटीत संपूर्ण धराली बाजारपेठ उध्वस्त झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीत प्रचंड मोठ्या प्रमाणात जिवीत आणि वित्तहानी झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे. लष्कर, एनडीआरएफ, एसडीआरएफ, पोलिस, मदत आणि बचावकार्य करत असून घटनास्थळी रुग्णवाहिका, वैद्यकीय पथक तैनात करण्यात आलं आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यातल्या अनेक भागांत पुढचे चार दिवस जोरदार पाऊस पडेल असा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विशेषतः विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता आहे. कोकणात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल.

## आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.